आर.सी.सी क्र.७९०/२०२५
सरकार विरुध्द. हर्षकुमार
निशाणी क्र.१८९/क पुढे चालु...

दिनांक १२.०३.२०२६ रोजी –

**अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र.२ सौ. शितल शिंदे यांची पुढील उलटतपासणी शपथेवर सुरु आरोपी पक्ष क्र.२ व ३ करिता आज रोजी विद्वान विधिज्ञ श्री. एस. डी. शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली असल्यामुळे त्यांनी नि.क्र.२५५ अन्वये मुदत मिळकण्याकरिता अर्ज दिला. खटल्याचे स्वरुप पाहता, प्रत्येक आरोपीवर वेगवेगळा भार अभियोग पक्षाने ठेवलेला असल्यामुळे मुदत देण्यास हरकत नसल्यामुळे अर्ज मंजुर करण्यात आला.**

**अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र.२ सौ. शितल शिंदे यांची पुढील उलटतपासणी शपथेवर सुरु श्री. पी. पी. पाटील विधीज्ञ यांचे द्वारा..**

**२१.** आमच्या कार्यालयाची वेळ सकाळी ०९.४५ ते ०६.१५ पर्यंत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कार्यालयात हालचाल वही ठेवली जाते. हे म्हणणे खरे आहे की, कार्यालयीन वेळेत सरकारी किंवा खाजगी कामासाठी बाहेर जायचे असल्यास हालचाल वहीत त्याची नोंद ठेवावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, ज्या कामासाठी आम्ही गेलेलो असतो ते पुर्ण करुन आल्यावर पुन्हा आल्याची नोंद हालचाल वहीत घ्यावी लागते. मी दिनांक २८.१२.२०२४ रोजी मी पंचनाम्यासाठी चालले म्हणुन हालचाल वहीत त्याची नोंद घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २८.१२.२०२४ रोजी पंचनाम्यासाठी कोठे व कधी हजर रहायचे याकरिता मला नोटीस मिळालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २८.१२.२०२४ रोजी माझे वरिष्ठ श्री. संजय सबनीस यांनी सांगितले म्हणुन मी त्यादिवशी आर्थिक गुन्हे शाखेत गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, या प्रकरणातील गुन्हा दाखल झाल्यानंतर ते आजपर्यंत मी आर्थिक गुन्हे शाखेच्या कार्यालयात फक्त एकदाच गेले होते. मला नि.क्र.१९२ पंचनामा दाखवला. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१९२ पंचनाम्यात मी दिनांक २८.१२.२०२४ रोजी पंचनाम्यावेळी हजर होते हा मजकुर नमुद नाही, जो मी सरतपासात सांगितला आहे. हे म्हणणे खरे आहे की, जे दोन मोबाईल फोन जप्त करण्यात आले त्याची बीले व ते कोणाच्या मालकीची आहेत ते

मी पाहिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी त्याचे बीलच पाहिले नाही त्यामुळे पंचनाम्यात त्या मोबाईलचे आय.एम.ई.आय. क्रमांक पंचनाम्यात कसे आले त्याबाबत मी सांगु शकत नाही. मला मोबाईल फोनचे पॅकींग कव्हर दाखवले. हे म्हणणे खरे आहे की, या दोन्ही पॅकींग कव्हरवर माझी व दुसरे पंच यांची सही नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्या गाडीचे आर.सी. बुक जप्त केले त्याचे बील मी पाहिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर वस्तु आरोपी क्र.४ कडुन का जप्त केल्या त्याचे कारणही त्या पंचनाम्यात नमुद नाही. आरोपी क्र.४ व माझे त्यादिवशी काही बोलणे झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी पंचनाम्यासाठी अंदाजे किती वेळ लागला ते मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्लॅटीनम कार्ड, डेबीट कार्ड, रुपे क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड, एच.डी.एफ.सी. पासबुक व आय.सी.सी.आय. चे चेकबुक हे खरे का खोटे याची पडताळणी मी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी न्यायालयात साक्षीला प्रथम आले त्यावेळी आरोपी क्र.४ ला प्रथम पाहिले. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२४ मध्ये पंचनामे झाले असल्यामुळे त्यामध्ये कोणत्या वस्तु, कोणते क्रेडीट कार्ड व कोणते पासबुक, चेकबुक जप्त झाले यासाठी मी प्रथम पंचनाम्याचे फोटो काढले, त्यानंतर पाठ केले व त्यानंतर न्यायालयात साक्ष दिली. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, कोणत्या बँकेचे याबाबत मला शंका होती त्याबाबत मी वाचले होते. पंचनामे करण्यात आले त्यावेळी आरोपीला माझी स्वतःची झडती मी दिली नव्हती. हे मला आठवत नाही की, पंचनामा करतेवेळी आरोपी क्र.४ ला हातकडी घातलेली होती अथवा नाही. दिनांक २८.१२.२०२४ रोजी पंचनामा करतेवेळी पोलीसांनी ऑडीओ किंवा व्हीडीओ केला किंवा कसे ते मला आता लक्षात नाही. मी नि.क्र.१९२ सोबत जप्त पंचनाम्यातील वस्तुंची यादी आरोपीला दिली नाही, अशी यादी पोलीसांनी आरोपीला दिली किंवा नाही ते मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१९२ सोबत जप्त वस्तु या पाकीटात ठेवल्या व त्याला लाखेचे सिल केले असे या पंचनाम्यात नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यात नि.क्र.१९२ वर त्या पाकीटावर माझी किंवा दुस–या पंचांची सही घेतल्याचे नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्याचा मजकुर पोलीस मला सांगत होते व मी तो लॅपटॉप वर टंकलिखीत केला असे काही झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पंचनाम्याचा मजकुर सांगत होते व आरोपी क्र.४ हि टंकलिखीत करत होती असे काही झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दुसरे पंच

व आरोपी क्र.४ व मी असे पोलीसांना मजकुर सांगत होतो व ते टंकलिखीत करत होते असे काही झाले नाही.

प्रश्न – पंचनामा नि.क्र.१९२ करिता मी पंचनाम्यासाठी तयार असलेबाबत माझी तपासी अंमलदाराने संमती घेतली नाही ?

उत्तर – संमती घेतली.

**२२.** हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा टंकलिखीत होत असतांना तो शब्द न शब्द काय टाईप होत आहे हे काही मी पाहिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या पंचनाम्यावर माझे नाव होते म्हणुन मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.४ च्या ताब्यातुन नि.क्र.१९२ प्रमाणे ज्या काही वस्तु जप्त केल्या त्यावेळी मी हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कोणत्याच वस्तु जप्त केल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सर्व खोटे सांगत आहे.

**आरोपी क्र.४ तर्फे उलटतपास संपला.**

**आरोपी क्र.५, ६ व ७ तर्फे विधीज्ञ श्री. सिताराम चव्हाण यांनी आरोपी क्र.१ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्विकारला.**

समक्ष

RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Date: 2026.03.13 11:27:52 +0530

( श्री. आर. एस. जांबोटकर )

मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

श्रवणोत्तर स्वीकृती.

RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Date: 2026.03.13 11:27:58 +0530

( श्री. आर. एस. जांबोटकर )

मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

दिनांक– १२/०३/२०२६.